SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION
PHONE : 0231– 2609105, Extension No. 202, 204
www.unishivaji.ac.in, Email : cde_sim@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
दूरध्वनी क्रमांक : ०२३१ –२६०९१०५, विस्तारित क्रमांक : २०२, २०४
www.unishivaji.ac.in, ई–मेल : cde_sim@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Ref.No : SU/CDOE/
संदर्भ : शिवाजी वि./सीडीओई /1510

Date
दिनांक : 21 SEP 2024

प्रति,
डॉ. श्रीमती संजीवनी महाले,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणानजीक, गोवर्धन, नाशिक,
जि.नाशिक

विषय : दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील स्वयंअध्ययन साहित्याच्या परीक्षणाबाबत.

महोदया,

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातंर्गत गुणवत्ता हमी केंद्रासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. १९/०५/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून तयार करण्यात आलेल्या स्वयंअध्ययन साहित्याचे आपणाकडून व आपण नामनिर्देशित केलेल्या तज्ञांकडून त्रयस्थ तज्ञ परीक्षक म्हणून परीक्षण करुन घेण्यात यावे असा ठराव समंत झाला आहे.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील शैक्षणिक वर्ष २०२४ – २०२५ मधील स्वयंअध्ययन साहित्याची यादी सोबत जोडली आहे. सदर यादीतील आपणाकडून परीक्षण करण्यात येणाऱ्या स्वयंअध्ययन साहित्याची माहिती या केंद्रास कळवावी जेणेकरुन संबधित स्वयंअध्ययन साहित्याची प्रत आपणाकडे परीक्षणासाठी पाठविण्यात येईल व उर्वरीत स्वयंअध्ययन साहित्याच्या परीक्षणासाठी तज्ञांची नावे (पत्ता व मोबाईल नंबरसह) या केंद्रास सूचित करावीत, ही विनंती. सदर परीक्षण करणाऱ्या तज्ञांना प्रत्येक स्वयंअध्ययन साहित्याच्या परीक्षणासाठी प्रत्येकी रुपये एक हजार याप्रमाणे मानधन आदा करण्यात येईल.

आपला विश्वासू

संचालक

सोबत : वरीलप्रमाणे